अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय)

# NOTICE

नोटीस क्र 91

दिनांकः 7 MAY 2026

## वरीष्ठ महाविद्यालयात पदवीच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया दि. ०७/०५/२०२६ पासून ऑनलाईन पध्दतीने व खालील नियमांनुसार सुरु होत आहे. यासाठी प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील फ्लो चार्ट, माहिती पुस्तक व संबंधित नोटीसेस काळजीपुर्वक वाचावेत. जेणेकरुन प्रवेश घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही.

इ. १२वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी दि. ०७/०५/२०२६ पासून महाविद्यालयाच्या www.tccollege.org या संकेतस्थळावर जाऊन प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहून आपला प्रवेश दिलेल्या मुदतीत निश्चित करावा.

१. **बी.ए. -** इ. १२वी मध्ये प्रथम प्रयत्नात पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

२. **बी.एस्सी.** - इ. १२वी शास्त्र शाखेमध्ये याच महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये व इतर महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ५५ टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये प्रवेश दिला जाईल. तसेच इ. १२वी शास्त्र शाखेमध्ये याच महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ५० टक्केपेक्षा कमी गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकडीमध्ये व इतर महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ५५ टक्केपेक्षा कमी गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकडीमध्ये प्रवेश दिला जाईल.

३. **बी.कॉम.** - इ. १२वी वाणिज्य शाखेत याच महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ६० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये व इतर महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ६५ टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये प्रवेश दिला जाईल. तसेच इ. १२वी वाणिज्य शाखेमध्ये याच महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ६० टक्केपेक्षा कमी गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकडीमध्ये व इतर महाविद्यालयात प्रथम प्रयत्नामध्ये ६५ टक्केपेक्षा कमी गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकडीमध्ये प्रवेश दिला जाईल.

४. **बी.एस्सी.कॉम्प्युटर सायन्स -** सदर कोर्स हा विनाअनुदानित तत्वावर आहे. इ. १२वी सायन्सने बोर्डाच्या परीक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेने प्रवेश मिळेल. **(यासाठी १२वी सायन्समध्ये 'गणित' विषय असणे आवश्यक आहे)**

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

५. **बी.व्होक. जर्नालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशन / रिटेल मॅनेजमेंट / डेअरी टेक्नॉलॉजी** - इ. १२वी मध्ये प्रथम प्रयत्नात पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

६. **बी.एस्सी. डेटा सायन्स** - इ. १२वी विज्ञान शाखेमध्ये प्रथम प्रयत्नामध्ये ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना थेट प्रवेश दिला जाईल.

७. **बी.एस्सी. फुड टेक्नॉलॉजी, बी.एस्सी. मिडीया ग्राफीक्स अॅण्ड अॅनिमेशन, बी.एस्सी. सायबर सिक्युरीटी अॅण्ड डिजिटल सायन्स, बी.एस्सी. ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी व बी.कॉम. फीनटेक** - इ. १२ वी परीक्षेमध्ये प्रथम प्रयत्नामध्ये ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना थेट प्रवेश दिला जाईल.

८. **बी.बी.ए. / बी.बी.ए.(सी.ए.) / बी.सी.ए.** – MH–CET परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर प्रवेश सुरु होतील. त्याची स्वतंत्र सुचना लावण्यात येईल.

वरील कोर्सची पात्रता पूर्ण केल्यानंतर प्रवेश घेऊन, फी भरुन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज व पात्रता अर्ज स्वतंत्रपणे आवश्यक कागदपत्रासह मा. प्रबंधक व मा. उपप्राचार्य यांच्या स्वाक्षरी घेऊन प्रशासन भवन येथे जमा करावा.

## - प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -

१. इ. १२वी शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या २ झेरॉक्स प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.
२. इ. १२वीचे मूळ गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत.
३. ई.बी.सी. / जात संवर्गाची फी सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर शासनानने दिलेल्या मुदतीत ऑनलाईन स्कॉलरशिप फॅार्म भरणे आवश्यक आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
४. पी.टी.एफ. / एस.टी.एफ. फी सवलतीचा फॉर्म सही शिक्क्या निशी अर्ज प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक आहे. (फक्त अनुदानित वर्गासाठी)
५. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्याची झेरॉक्स जोडणे आवश्यक.
६. विद्यार्थ्यांचे आधार कार्डची झेरॉक्स प्रत.
७. विद्यार्थ्याचा ABC ID / APAAR ID झेरॉक्स प्रत.
८. अलिकडच्या काळात काढलेला आयडेंटीटी कार्ड साईजचे २ फोटो.
**९. ऑनलाईन गुणपत्रिकेवर विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपाचा प्रवेश दिला जाईल.**
**१०. शाळा सोडलेला मुळ दाखला जमा करुन व मुळ गुणपत्रिका याची छाननी झालेनंतर आपला प्रवेश कायम केला जाईल याची नोंद घ्यावी.**

**सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी त्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या किमान १५ झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात. ऑनलाईन प्रवेश घेत असताना प्रवेश अर्जावर स्वत:चा ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर लिहिणे अनिवार्य आहे.**

प्रबंधक | चेअरमन प्रवेश प्रक्रिया | TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI | प्राचार्य

D:\sddeokar\sddeokar\Admn\ADM.2026-2027\Admn Process 2026-2027\Admission Process Notice.docx